# <u>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड</u>
## <u>नगरपालिका प्रशासन विभाग</u>
## <u>जाहीर सूचना</u>

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी दि.17.12.2021 रोजीच्या आदेशान्वये, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक 15.12.2021 च्या आदेशानूसार, माहे एप्रिल -2020 ते मे, 2021 या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या नांदेड जिल्हयातील नायगांव नगरपंचायतीच्या ना.मा.प्र. करीता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांकरीता आरक्षित ठेवावयाच्या जागांसाठी सुधारीत फेर सोडतीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यानुसार नायगांव नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या ना.मा.प्र. व ना.मा.प्र. महिला आरक्षणाच्या ऐवजी **सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांची सोडत काढणेसाठीचा कार्यक्रम**, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा एक तालुका उपविभागीय अधिकारी, नायगांव (खै.) यांचे अध्यक्षतेखाली नगरपंचायत कार्यालय, नायगांव येथे (गुरुवार) दिनांक 23.12.2021 रोजी, सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आला आहे.

तरी नायगांव नगरपंचायत क्षेत्रातील सर्व संबंधित नागरीकांनी आरक्षण निश्चितीच्या कार्यक्रमास, सोडतीच्या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येते.

स्थळः-नांदेड
दि.18.12.2021

(डॉ.विपीन भाप्रसे)
जिल्हाधिकारी नांदेड